# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:17.06.2025** **वार:मंगळवार**

---

•कॅनडामध्ये आयोजित जी-७ शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सहभागी होणार
•आर्थिक व्यवहार विषयक कृती गटाकडून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध
•इस्राइल-इराण संघर्ष तीव्र; नागरिकांनी तत्काळ तेहरान सोडावं; अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं आवाहन
•देशभरात दोन हजार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा सरकारचा निर्णय
•महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर; यावर्षी ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत भारत आणि श्रीलंकेत रंगणार सामने
•महाराष्ट्र कर्नाटकसह देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाचा इशारा; बिहारमध्ये वीज पडून १४ जणांचा मृत्यू

**<u>पंतप्रधान-जी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी कॅनडातल्या कनानास्किस इथं होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. पंतप्रधान मोदी सलग सहाव्यांदा या परिषदेत सहभागी होत आहेत. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी कॅनडाला भेट देत आहेत. या दोन दिवसांच्या दौऱ्यात ते अनेक द्विपक्षीय बैठकांमध्येही भाग घेतील. तसंच पंतप्रधान जी-७ देशांच्या नेत्यांशी, इतर आमंत्रित देशांच्या आणि आंतरराष्ट्रीय संघटनांच्या प्रमुखांशी ऊर्जा सुरक्षा, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, एआय-ऊर्जा संबंध आणि क्वांटम-तंत्रज्ञान अशा विविध जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करतील.

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा 'ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड' हा सर्वोच्च नागरी सन्मान काल सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्टोडॉलिडेस यांनी प्रदान केला. सायप्रसचे पहिले राष्ट्राध्यक्ष आर्चबिशप मकारिओस थर्ड यांच्या नावाने असलेला हा पुरस्कार विविध देशाच्या प्रमुख आणि नामवंत व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय कार्यासाठी दिला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली असून हा सर्व भारतवासीयांचा गौरव असल्याचं म्हटलं आहे. सायप्रसमध्ये गेल्या २३ वर्षातील भारताच्या पंतप्रधानांची ही पहिलीच भेट होती.

मोदी यांनी रविवारी लिमासोलमध्ये व्यापारविषयक परिषदेत सहभाग घेतला आणि उपस्थितांना तसंच भारतीय जनसमुदायाला संबोधित केलं.

**एफएटीएफ**

दहशतवादी कारवायांना होणाऱ्या अर्थ पुरवठ्यावर देखरेख ठेवणाऱ्या आर्थिक व्यवहार विषयक कृती गटानं म्हणजेच एफएटीएफनं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. दहशतवाद्यांच्या पाठीराख्यांच्या आर्थिक मदतीशिवाय असे हल्ले शक्य होत नाहीत असं या कृती गटानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. कुठलाही एक देश किंवा संस्था एकट्याने दहशतवादाच्या आव्हानाचा सामना करू शकत नाही, तर दहशतवाद रोखण्यासाठी जागतिक पातळीवर एकत्रित प्रयत्न आवश्यक असल्याचं एफएटीएफच्या अध्यक्ष एलिसा डी एंडा मदराजो यांनी म्हटलं आहे.

आर्थिक व्यवहार विषयक कृती गटानं एखाद्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्याची ही घटना काहीशी दुर्मिळ असून गेल्या दशकभरात या गटानं केवळ तीन वेळा असा निषेध नोंदवला आहे, एखादा देशच दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचं एफएटीएफनं अधिकृतरित्या नोंदवणं हे देखील प्रथमच घडत असल्याचं आमच्या वार्ताहरानं म्हटलं आहे.

**इराण**

इस्राईल आणि इराण यांच्यातला संघर्ष वाढत असून दोन्ही देश एकमेकांच्या पायाभूत सुविधा केंद्र आणि रहिवासी भागांवर हल्ले करत असल्याने संघर्षाची तीव्रता वाढत आहे. दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात वित्त आणि जीवितहानी होऊनही हा संघर्ष सध्या तरी कमी होण्याची चिन्ह नाहीत. इस्राइलनं काल इराणची राष्ट्रीय प्रसारण संस्था इस्लामिक रिपब्लिक ऑफ ईराण ब्रॉडकास्टिंग –म्हणजेच आयआरआयबीवर हल्ले केले. इस्राइलच्या पायाभूत सुविधा केंद्रांवर इराणनं केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं इस्राइलच्या सैन्य अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. दरम्यान इराणनं इस्राइलबरोबरचा संघर्ष थांबवावा आणि अणू कार्यक्रमाच्या मुद्दयावर चर्चा करावी असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. दोन्ही देशांच्या संघर्षात इस्राइलला कुठलीही प्रत्यक्ष मदत करणार नसल्याचं राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी म्हटलं आहे. इराण आणि इस्रायलमधल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व नागरिकांना तात्काळ तेहरान सोडण्याचं आवाहन केलं आहे. इस्राइल कडून होत असलेले हवाई हल्ले थांबवण्यासाठी अमेरिकेनं हस्तक्षेप करावा असं आवाहन इराणनं केलं आहे. दरम्यान संयुक्त राष्ट्रांच्या अणु निरीक्षकांच्या प्रमुखांनी इराणच्या सर्वात मोठ्या युरेनियम समृद्धीकरण केंद्राचं मोठं नुकसान झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

**वाहनचालक प्रशिक्षण**

सरकारनं देशाच्या विविध भागात दोन हजार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल नवी दिल्लीत एका

कार्यक्रमात बोलताना ही माहिती दिली. देशातील दुर्गम आणि आदिवासी भागात ही प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येतील, यामुळे तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं गडकरी म्हणाले. देशात सध्या सुमारे २२ लाख वाहन चालकांची आवश्यकता आहे; आणि या प्रशिक्षण केंद्रांमधून कुशल वाहन चालक तयार होतील असं गडकरी यावेळी म्हणाले.

**<u>धरतीआबा</u>**

आदिवासींच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे धरती आबा अभियान एक चांगली संधी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेसाठी ८० हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पालघर इथं केलं. पालघर जिल्ह्यातल्या मनोरमध्ये प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या ३२ जिल्ह्यातील पांच हजार गावांमध्ये हे अभियान राबविलं जाणार असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातल्या ६५४ गावांचा समावेश आहे. शासनाच्या १७ विविध विभागांच्या २५ योजना यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**<u>गुजरातडीएनए</u>**

अहमदाबाद विमान अपघातातल्या १२५ मृतांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे. त्यापैकी ८३ मृतदेह आधीच मृतांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत, अशी माहिती गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दिली आहे. उर्वरित मृतदेह योग्य प्रक्रिया आणि ओळख पूर्ण झाल्यानंतर लवकरच संबंधित कुटुंबीयांच्या ताब्यात दिले जातील,असंही पटेल यांनी सांगितलं.

अंत्यसंस्कार

अहमदाबाद इथल्या विमान दुर्घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या पार्थिव देहावर काल राजकोट इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि गुजरात मंत्रिमंडळातील अनेक नेत्यांनी रुपाणी यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<u>महिला क्रिकेट</u>**

आयसीसी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं महिलांच्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. या स्पर्धेची सुरुवात येत्या ३० सप्टेंबर रोजी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. स्पर्धेचा पहिला सामना भारत आणि श्रीलंका या दोन संघांमध्ये खेळवला जाईल. या स्पर्धेची उपांत्य फेरी २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी होणार असून अंतिम सामना ०२ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. स्पर्धेतला बहुप्रतिक्षित भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना येत्या ०५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा सामना श्रीलंकेत आर. प्रेमदासा स्टेडियमवर दुपारी ३ वाजता होणार आहे.

**<u>महिलाहॉकी</u>**

एफआयएच हॉकी प्रो लीगमध्ये, भारतीय महिला संघ आज आणि उद्या लंडनमधील ली व्हॅली हॉकी अँड टेनिस सेंटरमध्ये अर्जेंटिनाविरुद्ध खेळेल. सध्या ९ गुणांसह भारतीय महिला संघ ७ व्या क्रमांकावर आहे.

**<u>पुरुषहॉकी</u>**

क्वालालंपूर इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या एफआयएच हॉकी २०२५च्या दुसऱ्या दिवशी, काल चार रोमांचक सामने झाले. फ्रान्स आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांनी आपापले सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. कोरियानं वेल्सचा ३-२ असा पराभव केला तर फ्रान्सनं दक्षिण आफ्रिकेवर ३-४ अशी मात केली. पाकिस्ताननं जपानचा ३-२ असा पराभव केला तर न्यूझीलंडनं मलेशियाचा ४-३ असा पराभव केला.

**<u>हवामान</u>**

देशाच्या विविध भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. सौराष्ट्र आणि कच्छमधील काही ठिकाणी आज अतिमुसळधार पाऊस पडेल, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक किनारपट्टी महाराष्ट्रातही कोकण, आणि मध्य महाराष्ट्र, तसंच गोवा, आणि इशान्येकडील राज्यांमध्ये पुढील २-३ दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बिहार, झारखंड, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील काही ठिकाणी आज मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दिल्लीमध्येही येत्या तीन चार दिवसात वादळ आणि विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<u>बिहार</u>**

दरम्यान गेल्या २४ तासांत बिहारमधल्या आठ जिल्ह्यांमध्ये वीज कोसळून झालेल्या घटनांमध्ये १४ जणांचा मृत्यू झाला आहे. बक्सर जिल्ह्यात चार जणांचा मृत्यू झाला असून पश्चिम चंपारण आणि कटिहारमध्ये प्रत्येकी तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर कैमूर, लखीसराय, सीतामढी आणि भागलपूर जिल्ह्यातही काल संध्याकाळी वीज कोसळल्यानं मृत्यूची नोंद झाली आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**